साप्ताहिक धनसंतोष, कोरेगांव जि. सातारा (महाराष्ट्र)

# डी. पी. कॉलेजच्या शुभम देशमुखचे राष्ट्रीय आईस स्केटींग स्पर्धेत यश



कोरेगांव । जम्मु काश्मिर येथे संपन्न झालेल्या ऑल इंडिया पातळीवरील आईस स्केटींग क्रीडा स्पर्धेत येथील डी. पी. भोसले कॉलेजच्या शुभम दत्तात्रय देशमुख या विद्यार्थ्याने प्रथम क्रमांक पटकावला.

महाराष्ट्रातून राष्ट्रीय पातळीवरील आईस स्केटींग या स्पर्धेसाठी सहा विद्यार्थ्यांची निवड झाली होती, त्यात डी. पी. भोसले कॉलेजच्या राष्ट्रीय छात्र सेनेतील शुभम दत्तात्रय देशमुख याचा समावेश होता. या स्पर्धेसाठी भारतातून साठ विद्यार्थी सहभागी झाले होते. त्यात शुभम देशमुखने प्रथम क्रमांकाचे यश संपादन केले.

शुभमच्या या यशाबद्दल रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन डॉ. अनिल पाटील, सचीव प्राचार्य डॉ. गणेश ठाकूर, सहसचीव प्राचार्य डॉ. दिनानाथ पाटील, सातारा येथील २२ महाराष्ट्र बटालियन राष्ट्रीय छात्रसेनेचे कर्नल एस. के. पांडे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजयसिंह सावंत आदींसह विविध क्षेत्रातील मान्यवरांनी अभिनंदन केले.

शुभमला महाविद्यालयातील राष्ट्रीय छात्र सेनेचे विभाग प्रमुख प्रा. बाळासाहेब भोसले यांचे मार्गदर्शन लाभले.

डी. पी. भोसले कॉलेज ग्रंथालय कोरेगांव